# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ केस क्र.३१/ २०१७-१८/ 363 दिनांक : ०८-१२-२०१७

**आदेश केस क्र.३१(२०१७-१८)**

प्रति,
मे.श्रेया फ्लोरा,
गट क्र.२२७ नांदणी ता. शिरोळ,
जि.कोल्हापूर

**अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

**विरुध्द पक्षकार**

**कोरमः-** १.श्री ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार
**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे , अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

२) तक्रारदार मे. श्रेया फ्लोरा हया उच्च दाब ग्राहकाने दिनांक १९.०८.२०१७ रोजी ही तक्रार दाखल करुन अधिक्षक अभियंता (कोमं) कोल्हापूर मंडल, कोल्हापूर त्यांचे पत्र क्र. ५३३१ दिनांक ०९.०६.२०१७ ,सोबत जोडलेल्या ऑक्टोंबर २०१३ ते मार्च२०१७ हया कालावधी करीता वर्गवारी बदलाची रक्कम रु. ३१,५३,९२०/- (रु. एकतीस लाख त्रेपन्न हजार नऊशे वीस फक्त) चे पुरवणी देयकाबाबत आक्षेप घेऊन , सदर देयकाप्रमाणे रु. ३१,५३,९२०/- त्या कडून वसूल करु नये व त्या फरकापोटी त्यांचा वीज पुरवठा खंडीत करु नये असाआदेश पारीत करावा अशी मागणी केली आहे.

## तक्रारीचे संक्षीप्त स्वरुप

३) तक्रारदाराने गट क्र. २३७ नांदणी ता. शिरोळ जि. कोल्हापूर येथे,कोल्ड स्टोअरेज व ग्रीन हाऊस हया करीता, उच्च दाब कनेक्शन म.रा.वि.वि.कं.मर्या. (विरुध्द पक्षकार) त्यांचे कडून घेतलेले असून त्यांचा उच्च दाब ग्राहक क्र. २५२५३९०५०१९० असा आहे . सदर वीज पुरवठयाचा वापर कोल्डे स्टोअरेज व ग्रीन हाऊन साठीच करणेत येतो. दि. ०९.०६.२०१७ रोजीच्या पत्रासोबत अधीक्षक अभियंता(कोमं) कोल्हापूर हयांनी, कार्यकारी अभियंता, जयसिंगपूर हयांचे दि. १८.०२.२०१७ चे स्थळ तपासणी अहवालानुसार व वाणिज्य परिपत्रक क्र. २७५, २४३, १७५ नुसार सदर उच्च दाब वीज पुरवठयाची HT-VA ही वर्गवारी बदलून HT-VB हया वर्गवारीत प्रमाणे ऑक्टोंबर २०१३ ते मार्च २०१७ हया कालावधी करिता रु. ३१,५६,९२०/- (एकतीस लाख छपन्न हजार नऊशे वीस फक्त) ची मागणी करणारे पुरवणी देयक देऊन मुदतीत सदर रक्कमेचा भरणा करण्यास सांगितले. तक्रारदारांचे कथनानुसार सदरची मागणी अयोग्य असून ती मान्य नाही. त्यामुळे तक्रारदाराचा वीज पुरवठा सदरच्या फरकांचे रक्कमेकरिता बंद करु नये. असा आदेश मंडल कार्यालयास करावा अशी मागणी केलेली आहे.

## वितरण कंपनीची भूमिका

४) विरुध्द पक्षकारांचे कथनानुसार तक्रारदार उच्च दाब विज ग्राहक असून त्याला १३० के.व्ही.ए. चा विद्युत भार असलेला विज पुरवठा ग्राहक क्र. २५२५३९०५०१९० हया क्रमांकाने गट.क्र. २२७ नांदणी ता. शिरोळ ,जि. कोल्हापूर येथे उच्च दाब शेतीसाठी वीज पुरवठा देण्यात आलेला आहे. सदर विद्युत पुरवठयाबद्दल मंडल कार्यालय, कोल्हापूर येथे शासकीय लेखा परीक्षक (Govt.Audit) चालू असतांना लेखा परीक्षकांनी (Auditor) आक्षेप घेतला असताना, कार्यकारी अभियंता , जयसिंगपूर त्यांना स्थळ तपासणी करुन , अहवाल सादर करण्यास आदेश देण्यात आले. कार्यकारी अभियंता जयसिंगपूर हयांनी पत्र क्र. १०६६ दि. १८.०३.२०१७ अन्वये सदर उच्च दाब शेती विज पुरवठयाचा वापर ग्रीन हाऊस व कोल्ड स्टोअरेज हयासाठी केला जात आहे असा अहवाल दिला .वाणिज्य परिपत्रक क्र. २७५ दि. १८-११-२०१६ अनुसार सदरचा वापर HT-VB: HT Agriculture others हया वर्गवारीत येतो. तथापि तक्रारदारांस (H.T. V.A.Category Tarrif code ११९) प्रमाणे बिले देण्यात आलेली होती व आहेत.तथापि विजेच्या प्रत्यक्ष वापरा प्रमाणे योग्य ती वर्गवारी लावून HT V वर्गवारी लावले तारखेपासून HT-A वर्गवारी बदलून HTV-B वर्गवारी प्रमाणे विज आकारणी करुन फरकाची रक्कम तक्रारदाराकडून वसूल करुन घेणे आवश्यक झाल्यामुळे सदरचे पुरवणी विज बिल आकारण्यात आलेले असून ती मागणी केलेली आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण



५) प्रस्तुत अपिल दाखल करणे पूर्वी दि. २८.०७.२०१७ रोजी तक्रारदाराने अंतरिम मनाईचा अर्ज दाखल करुन सदर पुरवणी बिलाची रक्कम वसूल करु नये व त्या करिता तक्रारदाराचा विज पुरवठा खंडीत करु नये, असा अंतरिम आदेश व्हावा,अशी मागणी केली (अंतरिम आदेश केस क्र. ३१/२०१७ त्यावर विरुध्द पक्षकाराचे म्हणणे ऐकून घेऊन त्या मंचाने दि. ०४.०८.२०१७ आदेश पारीत करुन, तक्रारदाराकडून रक्कम रु. ६,००,०००/- भरुन घेऊन त्या मंचाचा अंतिम निकाल होई पर्यन्त चालू बिले नियमाप्रमाणे वसूल करुन घ्यावीत व त्यांच्या विद्युत पुरवठा खंडीत करु नये व तक्रारदाराने १५ दिवसाचे आत हया मंचाकडे रितसर तक्रार दाखल करावी असा आदेश पारीत केला तद्नंतर तक्रारदाराने सदरची तक्रार दाखल केलेली आहे.

६) प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दि. १४.११.२०१७ रोजी घेण्यात आली.त्यावेळी तक्रारदारांतर्फे त्यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री दोडमणी व विरुध्द पक्षकारांतर्फे श्री सागर मारुळकर,कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर हे हजर होते व त्यांनी आपआपला युक्तिवाद तोंडी सादर केला सर्व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यांत आले .

७) तक्रारदारांचे गा-हाणे, वि.प. त्यांचे म्हणणे व युक्तिवाद आणि उपलब्ध कागदपत्रे ,हया वरुन खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात.

| | |
|---|---|
| प्रश्न क्र.१: | ऑक्टोंबर-२०१३ ते मार्च-२०१७ हया कालावधी करता वर्गवारी बदलामुळे पुरवणी बिलामध्ये , करण्यांत आलेली रक्कम रु. ३१,५६,९२०/- रु. ची मागणी अयोग्य व बेकायदेशीर आहे काय? |
| उत्तर: | अंशत: होय.<br>ऑक्टोंबर-२०१३ ते ऑक्टोंबर-२०१६ पर्यन्त चीच मागणी बेकायदेशीर आहे. |
| प्रश्न क्र.२: | तक्रारदार मागणी करतात त्याप्रमाणे सदर रक्कमेच्या वसूली पोटी तक्रारदाराचा विज पुरवठा तोडू नये/खंडीत करु नये असा आदेश होणे योग्य आहे काय? |
| उत्तर: | होय. |
| प्रश्न क्र.३ | अंतिम आदेश? |
| उत्तर: | खाली नमूद केले प्रमाणे. |

## कारण मिमांसा

८) मुद्दा क्र.१ ते ३ (एकत्रितपणे) :- प्रस्तुत प्रकरणांतील बहूतांशी बाबी (facts) उभय पक्षकारांस मान्य आहेत. त्यांचा पुनरुच्चार, विस्तारापोटी टाळण्यांत येत आहे. तथापि तक्रारदारास ग्रीन हाऊस व कोल्ड स्टोअरेज चालविण्याकरिता उच्चदाब (शेती) हया वर्गवारीत देण्यात आलेला आहे व केवळ त्याच कारणाकरिता सदरचा विज पुरवठा वापरण्यांत येत आहे ही बाब उभय पक्षी मान्य आहे. सदर ग्राहकाचा जोडलेला विद्युत भार, हा त्यांच्या मागणी प्रमाणे १३० KVA आहे व ही बाब देखील उभय पक्षी मान्य आहे.

९) विरुध्द पक्षकाराचे कथनानुसार प्रस्तुत तक्रारदारांस, दर संकेतांक H.T.V-A असा लागू करण्यात आलेला होता. सदरचा दर संकेतांक हा शेती ग्रहाकंसाठी सवलतीच्या दराचा आहे तक्रारदाराचा वापर हा ग्रीन हाऊस व कोल्ड स्टोअरेजचा असल्यामुळे तो Hitech Agr. consumer असून त्यास सवलंतीचा दर संकेतांक लागू नसताना ही ऑक्टों-२०१३ पासून सवलतीचा दर संकेतांक ६३ हया अनुसार त्यास बिल आकारणी करण्यांत येत होती. तक्रारदारांस वाणिज्य परिपत्रक क्र. १७५ दि. ०५.०९.२०१२ नुसार सदर वापराकरिता विना सवलतीचा शेती दर संकेतांक ४० हा लागू करणे आवश्यक होते(HTV-B Agr.others) सदर चुकीच्या दर आकारणी बाबत शासकिय लेखा परिक्षकाना आक्षेप नोंदविण्यात आल्यानंतर , स्थळ तपासणी करुन आधीचा दर संकेतांक HT-VAवसूल H.T.V.B हा विना सवलतीचा दर संकेतांक ऑक्टोंबर-२०१३ पासून लागू करुन त्यानुसार तक्रारदारास प्रत्यक्षात आकारण्यांत आलेला दर संकेतांक व त्यास लागू असताना दर संकेतांक हयातील फरकाच्या रक्कमेची मागणी सदर पुरवणी बिलानुसार करण्यात आलेली असून ती योग्य आहे.

१०) तक्रारदारातर्फे , त्यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री दोडमणी हयांनी असे निवेदन केले की, विरुध्द पक्षकांरानी पुर्वलक्षी प्रभावाने विज बिल दर संकेतांक बदल लागू केलेला असून तो बेकायदेशीर आहे व त्यानुसार ऑक्टोंबर-२०१३ पासून ची फरकाची मागणी बेकादेशीर आहे. तथापि तक्रारदार नविन दर संकेतांक बदला प्रमाणे लागू पडणारे विना सवलतीचे बिल , नोव्हेंबर २०१६ च्या मा. विज निमायक आयोगाच्या दर बदला प्रमाणे ,नोव्हेंबर-२०१६ पासून, तो बदल लागू पडल्या तारखे पासून पुढे भरण्यांस तयार आहे. सदरची ऑक्टोबर-२०१३ पासून नोव्हेंबर-२०१६ पर्यन्तची पुरवणी बिलाची मागणी बेकायदेशीर आहे. हया आपल्या निवेदनाच्या पुष्ठयर्थ तक्रारदारातर्फे मा. विद्युत लोकपाल (मुंबई) त्यांच्या वि.लो./आदेश/३ व ४-२०१६/३७४ दि. १६ फेब्रुवारी-२०१६ हया आदेशाचा आधार घेण्यात आला.

११) विरुध्द पक्षकारातर्फे श्री सागर मारुळकर त्यांनी असे प्रतिपादन केले की तक्रारदार हे Hitech Agr.consumerअसून त्यांना कोंणतीही Subsidy सवलत लागू नव्हती नोव्हेंबर २०१६ पूर्वी सर्व शेती विज ग्राहकांकरिता एकच दर संकेतांक होता तथापी कृषी विद्युत पंपाकरिता व ठिबक सिंचना करिता शेतक-यांना शासनातर्फे अतिरिक्त सवलत (Addt.Subsidy) देण्यात येत होती. परंतु ही अतिरिक्त सवलत Hitech Agr.Consumersना लागू नव्हती ऑक्टो.२०१३ ते जून-२०१५ पर्यन्त Hitech Agr. Consumers ना रु. २.८८ K.W.H.हा दर लागू होता. तो दर जून-२०१५ मध्ये बदलण्यांत येऊन नोव्हेंबर-२०१६ पर्यन्त रु. ३.३२ per K.W.H.असा करण्यांत आला नोव्हेंबर-२०१६ मध्ये मा. विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशनुसार शेतकरी विज ग्राहकांच्या दोन वर्गवारी (१) H.T.-V.A. व (२) H.T.-VB ( Agri.others) अशा करण्यांत आल्या. HT-V B (Agr.others) हया वर्गवारी करीता रु. ४.३५ per KWH हा दर लागू करण्यांत आला. पुरवणी बिलांत ऑक्टो.२०१३ ते ऑक्टोंबर-२०१६ पर्यन्त करण्यात आलेली मागणी ही जुन्या दराप्रमाणे ती सवलत आणि विना सवलत त्या फरका प्रमाणे असून नोव्हेंबर-२०१६ पासून लागू करण्यांत आलेली दर फेरबद्दल/ वर्गवारी बदल, तक्रारदारास पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यांत आलेली नाही. त्यामुळे तक्रारदाराची मागणी मान्य करता येणार नाही.

१२) मा. विद्युत लोकपालांनी उपरनिर्दीष्ट प्रकरणांमध्ये आपल्या केस क्र. २४/२००१ मधील दि. ११.०२.२००३ च्या तसेच विअन्ने एंटरप्राईजेस - वि. केरळा स्टेट ईलेक्ट्रीसिटी रेग्युलेटरी कमिशन(अपिल क्र.१३१/२०१३) मधील APTEL ने दिलेल्या निकालांचा आधार घेऊन वर्गवारी बदलास पुर्वलक्षी प्रभाव ठेवून , जरी शासकिय लेखा परीक्षकाने निर्देश दिलेले असतील तरी नविन वर्गवारी प्रमाणे मागील थकबाकीची वसूली करता येणार नाही. असा कोणताही वर्गवारी फेरबदल हा (Prospetive application) फेरबदलाच्या दिनांका पासून पुढील काळाकरिता लागू करावा असा दंडक घालून दिलेला हा दंडक हया मंचावर बंधनकारक आहे. सदर प्रकरणांत शासकिय लेखापरीक्षण फेब्रुवारी-२०१७ मध्ये झाले हया बाबत कोणाचेही उतर नाही तसेच त्या लेखा परीक्षाणामध्ये तक्रारदारांस लागु केलेल्या दर सवलतीच्या दर संकेतांकाबाबत आक्षेप घेण्यात आला व त्यामुळे स्थळ पाहणी होऊन विज बिल आकारणी करताना झालेल्या चुकीची कल्पना आली हया बदल ही उभय पक्षांत वाद नाहीत. किंबहूना वर नमूद केल्याप्रमाणे तक्रारदारांचे प्रतिनिधी श्री दोडमणी हयांनी नोव्हेंबर-२०१६ पासून वर्गवारी फेरबदलानुसार आकारल्या जाऊ शकणा-या बिल आकारणी भरण्यास तक्रारदार तयार असल्याचे हया मंचासमोर निवेदन केलेले आहे.श्री सागर मारुळकर हयांचे कथनानुसार पुरवणी बिलात ऑक्टोंबर-२०१३ ते ऑक्टोंबर २०१६ हया काळात तक्रारदाराने उपभोगलेल्या सवलतीच्या रक्कमेचा समावेश आहे. त्यामुळे ती रक्कम तक्रारदारांकडून वसूल करणे आवश्यक आहे व ती रक्कम वर्गवारी फेरबदलाची नाही. श्री मारुळकर त्यांचे सदरचे कथन दोन गोष्टीवरील मान्य करता येत नाही. एकतर तक्रारदारांत सवलतीचा दर संकेतांक कसा लावण्यात आला, तो कोणाच्या चुकीमुळे लावला, त्याबाबत विरुध्द पक्षकारांने संबंधीतावर काय कारवाई केली त्याबाबत खुलासा कोठेही करण्यांत आला नाही. तसेच लेखा परीक्षणाचा अहवाल व सदर वसूली करण्याबद्दल लेखा परीक्षाने दिलेल्या सुचना त्या मंच्यासमोर आलेल्या नाहीत. केवळ तोंडी निवेदन करताना आले आहे. तसेच ऑक्टोंबर २०१३ पासूनची थकबाकी ही मुळात कालबाहय आहे. आणि दुसरे असे जर संकेतांक चुकीचा लागला आणि ती चुक नंतर लक्षात आली तरी ती चुक दुरुस्त करणे हा एक प्रकारचा दरबदल होतो आणि वर नमुद केलेल्या मा. विद्युत लोकपालांच्या निर्णया प्रमाणे तो पुर्वलक्षी पध्दतीने लागू करता येत नाही. सदरचा दरबदल करतेवेळी व त्यानुसार थकबाकीची मागणी करतांना तक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेण्याची त्यास लेखी देण्यात आले असेही विरुध्द पक्षकाराचे म्हणणे नाही. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वः देखिल भंग हया ठिकाणी झालेला दिसतो . सबब ऑक्टोंबर-१३ ते ऑक्टोंबर-२०१६ पर्यन्तची थकबाकीची मागणी बेकायदेशीर आहे, असा हया मंचाचा निर्ष्कष आहे. तथापी नोंव्हेंबर-२०१६ पासून बदलेल्या दर संकेतांचा प्रमाणे पुढील विज बिले व त्यांची थकबाकी भरण्यास तक्रारदाराची हरकत नाही. असे निवेदन श्री दोडमणी हयांनी केल्याचे वर नमुद केलेलेचे आहे. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर आम्ही अंशतः होकारार्थी दिलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

१३) वर नमूद कारणा करिता सदरच्या वादातील पुरवणी विज बिलानुसार ऑक्टोंबर-२०१३ ते ऑक्टोंबर-२०१६ च्या कथित थकबाकीची वसुली करण्यांचा कोणाताही अधिकार वि.प. ला येत नाही व ती थकबाकी वसूल करणे, कामी कोणतेही, विज पुरवठा खंडीत करणे इ. कठोर पाऊल वि.प.ला घेता येत नाही.तथापि तक्रारदारानेच वर नमूद केल्याप्रमाणे बदललेल्या दर संकेतांका प्रमाणे आहे. नोव्हेंबर २०१६ पासूनची थकबाकीची भरण्याची व त्या पुढील काळाची विज बिल भरण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे तक्रारदारांची मागणी अंशतः मंजूर करावी लागेल असा हया मंचा निष्कर्ष आहे.

१४) वरील सर्व बाबींचा विचार करता, तक्रारदास अंतरिम आदेशप्रमाणे रक्कम रु. ६,००,०००/- सदर पुरवणी विज बिलापोटी भरणा करण्याचा आदेश झालेला आहे, ही बाब लक्षांत घेता , खालील आदेश न्यायोचीत राहिल असे हया मंचाचे मत आहे.सबब मुद्दा क्र.१ ते ३ चे वरील प्रमाणे निष्कर्ष नमूद करुन हे मंच खालील आदेश करीत आहे.

## अंतिम आदेश

तक्रारदाराची तक्रार, अंशतः मंजूर करण्यात येतआहे.

१) विरुध्द पक्षकारांस मे-२०१७ च्या रक्कम रु. ३१,५६,९२०/- च्या वसुली करीता तक्रारदाराचा विज पुरवठा खंडीत किंवा कायम स्वरुपी बंद करण्या पासून मनाई करण्यात येत आहे विरुध्द पक्षकारांने , तक्रारदारास नोव्हेंबर-२०१६ पासून दर संकेताकांतील फेरबदलानुरुप HT-VB(Agr.others) हया वर्गवारी प्रमाणे मे-२०१७ पर्यन्तच्या थकबाकीचे पुरवणी बिल घ्यावे. ते देत असतांना तक्रारदारांचे जर अंतरिम आदेश केस क्र. ३१(२०१७-१८) मधील दि. ०४.०८.२०१७ च्या आदेशा प्रमाणे रक्कम रु. ६,००,०००/- च्या भरणा केला असल्यास , ती रक्कम सदर काळातील थकबाकी आणि जर भरलेली रक्कम जास्त असल्यास, त्या पुढील काळा करता आकारणी केलेल्या विज बिलांच्या रक्कमेपोटी समायोजीत करावी. हया आदेशाच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत करावी. तक्रारदाराने व वर्गवारीतील फेरबदला प्रमाणे नविन विज बिल येथून पुढे भरत जावे.केलेल्या कारवाईचा अहवाल विरुध्द पक्षकाराने हया मंचास कारवाई केल्यापासून ८ दिवसांत द्यावा.

२) हया आदेशा विरुध्द अपिल दाखल करावयाचे असल्यास या आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कूर्ला-कॉम्प्लेक्स , बांद्रा(पूर्व) मुंबई येथे दाखल करावे

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( पी.एस. बुरांडे)
ग्राहक सदस्य

(पी. व्ही. खपली)
सदस्य सचिव

(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

**श्री.प्रदिप वि . खपली सदस्य,सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर केस क्र. ३१(१७-१८) चा न्याय निर्णय मला मान्य नाही. सबब मी माझे या आदेशाबाबत वेगळे मत देत आहे. कृपया तो या निर्णयाबाबत निकालाचा भाग समजावा.**

मे. श्रेया फ्लोरा गट क्र.२२७ नांदणी ता. शिरोळ जि. कोल्हापूर हे उच्च दाब विद्युत ग्राहक (HT Consumers) असून त्यांचा विजभार १३० के.व्ही. ए. आहे. त्यांचा विज वापर हा कोल्ड स्टोअरेज, ग्रीन हाऊस इत्यादी Agriculture हायटेक प्रकारामध्ये होतो.

परंतु मानवी चुकीमुळे त्यांना Ag.Hightech अंतर्गतचा दर न लावता साधारण शेती पंपाचा म्हणजे शासनाची सबसिडी असलेला दर लावण्यात आला. साहजिक १३० KVA विद्युत भार असल्यामुळे त्यांना मिळणारी महाराष्ट्र शासनाकडून सबसिडीची रक्कम मोठया प्रमाणात मिळाली की, ज्या रक्कमेच्या प्राप्तीसाठी ते पात्र नाहीत.

परंतु ही बाब लक्षात आल्यानंतर ऑक्टोंबर २०१३ पासून आतापर्यन्त त्यांना शासनाची सबसिडी मिळाली आहे व त्यावर त्यांचा निश्चितच अधिकार नाही. मेसर्स रोटो टेक्स विरुध्द दादरा नगर हवेली इले. कं.W.P.No.७०१५ of २००८ यामधील मा. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मानवी चुकीमुळे जर थकबाकी निर्माण झाली असेल तर ती वसूल करण्याचा अधिकार आहे असे म्हटले आहे.

त्यामुळे Principle of Natural Justice नुसार ग्राहकाने त्यांना चूकुन मिळालेली शासनाची सबसिडीची मुळ रक्कम प्रामाणिकपणे परत करावी. ती रक्कम ग्राहकाच्या सोयीनुसार सुलभ हप्त्यांमध्ये ग्राहकाकडून वसूल करावी. असे माझे मत आहे.

तसेच वरील गा-हाणे निर्माण होण्यास कारणीभुत असणारे दोषी कर्मचारी/अधिकारी यांची खातेनिहाय चौकशी करुन त्यांचेवर शासनाच्या नियमाप्रमाणे उचित कारवाई करणेत यावी.

## आदेश

१) ग्राहकाची मागणी फेटाळण्यात येत आहे.
२) दोषी कर्मचारी/अधिकारी यांचेवर नियमाप्रमाणे कारवाई करणेत यावी.

8/12

दिनांक : ०८.१२.२०१७

( पी.व्ही.खपली )
सदस्य सचिव तक्रार निवारण मंच कोल्हापूर

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण